drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
13 Feb, 2025

## Total Mention 3

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 2 | N/A | N/A | 2 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 1 | N/A | N/A | N/A | 1 |

| Online |
|---|
| N/A |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Sakal | Withdraw the directive regarding properties! | Mumbai | 3 |
| 2. | Lokmat | Even the upper floor slum dwellers in Dharavi will get a house | Mumbai | 1 |

Sakal • 13 Feb • Dharavi

## Withdraw the directive regarding properties!

| 3 • PG | 109 • Sqcm | 71631 • AVE | 352.42K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai



# मालमत्तांबाबतचे निर्देशपत्र मागे घ्या!

## धारावी बचाओ आंदोलनाचा मोर्चा

धारावी, ता. १२ (बातमीदार) : धारावी अधिसूचित क्षेत्रातील मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील मालमत्ता आणि जागांबाबतचा निर्णय यापुढे धारावी पुनर्विकास प्रकल्प/प्राधिकरणाच्या (डीआरपी) परवानगीने घ्यावा लागणार आहे. अधिसूचित क्षेत्रातील मालमत्तांबाबत पालिकेने निर्देशपत्र जारी केले असून, याला धारावी बचाओ आंदोलनाने विरोध दर्शवला आहे. याबाबत निषेध करण्यासाठी शनिवारी (ता. ८) पालिकेच्या दादर येथील ग/उत्तर विभाग कार्यालयावर धारावी पुनर्विकास समितीअंतर्गत सर्वपक्षीय व सर्व संघटनांनी धारावी बचाओ आंदोलनातर्फे मोर्चा काढला होता.

मालमत्ता विभागाच्या जमिनी व त्यावरील बांधकामे याबाबतचे सर्वाधिकार धारावी पुनर्विकास प्राधिकरणाकडे सोपविणारे पत्रक मागे घेण्यात यावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या माध्यमातून धारावीकरांवर पालिका अन्याय करीत आहे, असा आरोप करण्यात येत आहे. पालिकेच्या मालकीच्या जमिनींवरील चाळी अदाणी समूहाच्या कंपनीला सुपूर्द करण्याच्या निर्णयामुळे चाळीत राहणाऱ्या रहिवाशांचे घरांवरील मालकी हक्क संपुष्टात येणार असल्याची भीती रहिवासी व्यक्त करीत आहेत.

ग/उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त अजितकुमार आंबी यांना निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळात आमदार महेश सावंत, माजी आमदार बाबुराव माने, ॲड. राजू कोरडे, माजी नगरसेवक वसंत नकाशे, विठ्ठल पवार उपस्थित होते. बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्यात येतील. परिपत्रक रद्द करण्यात आलेले नाही, अशी प्रतिक्रिया अजितकुमार आंबी यांनी दिली.

The Dharavi Bachao movement protested against the Mumbai Municipal Corporation's decision to involve the Dharavi Redevelopment Project Authority (DRP) in property matters. Residents fear losing ownership due to the decision to hand over chawls to a private company. A delegation met Assistant Commissioner Ajit Kumar Ambed, seeking the withdrawal of the directive.

Lokmat • 13 Feb • Dharavi

## Even the upper floor slum dwellers in Dharavi will get a house

| 1 • PG | 153 • Sqcm | 153249 • AVE | 604.7K • Cir | Top Right | Hello Mumbai |
| --- | --- | --- | --- | --- | --- |

Mumbai

# धारावीतल्या वरच्या मजल्यावरील झोपडीधारकालाही मिळणार घर

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्प हा विशेष जनहित प्रकल्प असून, धारावीत १५ नोव्हेंबर २०२२ पूर्वी अस्तित्वात असलेल्या वरच्या मजल्यावरील झोपडीधारकांना पुनर्विकास प्रकल्पात सामावून घेतले जाणार आहे. त्यांचे पुनर्वसन धारावीबाहेर केले जाईल. या झोपडीधारकांना २५ वर्षांसाठी भाडे आकारून ३०० चौरस फुटांचे घर दिले जाईल. या योजनेत २५ वर्षांच्या कालावधीत कधीही एकत्रित रक्कम भरून धारावीकरांना घराचा मालकी हक्क घेता येईल. घरांची किंमत आणि भाडे शासनाच्या धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट (डीआरपी) मार्फत निश्चित करण्यात येणार आहे.

उच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या सुनावणीवेळी वरच्या मजल्यावरील झोपडीधारकांना अपात्र ठरवणारी कायद्यातील तरतूद योग्य असल्याचा निर्वाळा दिला. मात्र, शासनाच्या वतीने विशेष जनहिताच्या प्रकल्पाचा दर्जा प्राप्त असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पातील वरच्या मजल्यावरील झोपड्यांना हा निकाल लागू असणार नाही. शासनाने आधीच घोषित केलेल्या धोरणानुसार धारावीतील वरच्या मजल्यावरील झोपडीधारकांना पुनर्विकास प्रकल्पात सामावून घेतले जाणार आहे, अशी माहिती धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सूत्रांनी दिली.



### योजनेच्या लाभासाठी लागणार ही कागदपत्रे...

**वरच्या मजल्यावरील झोपडीधारकांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी वीज बिल, नोंदणीकृत खरेदी किंवा भाडे करार, आधारकार्ड, रेशनकार्ड, मजल्याचा उल्लेख असलेला पासपोर्ट अथवा तळमजल्यावरील सदनिका धारकाचे शपथपत्र अशी कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत.**

The Dharavi redevelopment project will rehabilitate slum dwellers on upper floors, offering them rented accommodation for 3 years with the option to own a 4-square-foot house. The High Court approved the scheme, requiring documents like electricity bills, Aadhaar, and ration cards for eligibility, excluding ground-floor huts.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **1** | **Lokshahi Marathi (1)** |

1. Lokshahi Marathi 1

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




A top-floor house owner in Dharavi will get a house. Criteria are applicable as it is a project of special public interest. W...

News • Marathi • 11:39 AM 13 Feb, 2025